## रे.क.नं. ७०/२०१४ मध्ये निशाण १०३ खालील आदेश.

यातील वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १७ नियम २ व आदेश ९ नियम ६(१)(अ) प्रमाणे प्रतिवादी क्रमांक २ ते ४ विरुध्द एकतर्फा आदेश होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. यातील प्रतिवादी क्रमांक २ ते ४ नि. १११ ला म्हणणे दाखल करुन तीव्र हरकत नोंदविलेली आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांनी अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

३. यातील वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व आज्ञार्थी मनाईसाठी दाखल केला आहेत. प्रस्तुत दाव्याचे कामी अद्याप मुद्दे काढलेले नाहीत. प्रस्तुत दाव्याच्या कामी प्रतिवादी क्रमांक २ ते ४ हे नियमित गैरहजर राहतात म्हणून त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश करणेत यावा असे वादीचे कथन आहे. प्रस्तुत प्रतिवादीने त्यांची कैफियत दाखल केल्यापासून म्हणजे दिनांक ०४.०६.२०१४ पासून न्यायालयात उपस्थित नाहीत. म्हणून त्यांना दाव्यामध्ये स्वारस्य नसल्याने त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश करण्याची विनंती केली आहे. प्रस्तुत कामातील प्रतिवादी यांनी या अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांनी सदरचा दावा मुद्दे काढून अद्याप चौकशीच्या स्टेजला आलेला नाही त्यामुळे आदेश ९ नियम ६ दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ मधील तरतुदी लागू होत नाहीत. प्रस्तुत प्रतिवादी यांनी नि.४८ ला रितसर कैफियत दाखल केलेली आहे. तसेच सदर प्रतिवादींचे वटमुखत्यार सुंदर शामराव पांढरे याकामी नियमित हजर असतात. दावा अद्याप चौकशीला लागलेला नाही त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादींची उपस्थिती आवश्यक नाही. प्रस्तुत काम दिवाणी स्वरुपाचे असल्याने प्रतिवादीच्या वतीने त्यांचे वकिल हजर राहून कामकाज चालवू शकतात. त्यामुळे वादीने दिलेला अर्ज रद्द करणेत यावा अशी विनंती केली. वादीच्या विद्वान

वकिलांनी सदर अर्जाच्या पृष्टर्थ त्यांचा विश्वास हसना बेगम विरुध्द श्री. कौशीकदास –सी.आर.पी.क्र. ४९/२०१४ या न्यायनिवाड्यावर दाखवला. सदर प्रकरणी मा.गुवाहाटी उच्च न्यायालयाने असा न्यायनिवाडा केला आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १०, आदेश ९ नियम ६ प्रमाणे जर प्रतिवादी नोटीस मिळून देखील न्यायालयात उपस्थित राहत नसतील तर त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश करुन निकाल देता येईल असे निर्देश दिले आहेत. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम ६(१)(अ) प्रमाणे दावा एकतर्फा केंव्हा करता येईल, जर दावा चौकशीला असेल, जर प्रतिवादींनी नोटीस लागून देखील कैफियत दिली नसेल त्यावेळी प्रतिवादींचे विरुध्द एकतर्फा आदेश करता येईल. सदर न्यायनिवाड्याचे बारकाईने निरिक्षण करता असे दिसून येते की, सदर न्यायनिवाडा याकामी प्रतिवादींच्या कथनास लागू होतो. सदर कामी प्रतिवादी क्रमांक २ ते ४ यांनी हजर होवून कैफियत दिली आहे. तसेच सदर कामी त्यांचे विद्वान वकिल न्यायालयापुढे उपस्थित राहून प्रत्येक तारखेला कामकाज पाहतात. तसेच सदरचा दावा अद्याप चौकशीला नाही त्यामुळे सदरच्या न्यायनिवाडा प्रतिवादीच्या कथनाला लागू होतो. सदर कामी प्रतिवादीचे वकिल नियमित हजर असतात व प्रस्तुतच्या दिवाणी दाव्यात प्रत्येक तारखेला प्रतिवादींची उपस्थिती आवश्यक नसते. त्यामुळे वादीने दिलेला प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याच्या निर्णयावर मी येत असून त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश.

अर्जदारचा नि.१०३ चा अर्ज खर्चासह रद्द करणेत येत आहे.

सही/-

पेठवडगाव (सं.मा.जाधव)

दि. ०३.०५.२०१७. दुसरे सह. दिवाणी न्यायाधिश,क.स्तर.

पेठवडगांव.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Mrs. Rajashri Rajendra Sawant (L.G.) |
| Name of Court | Shri. S.M.Jadhav, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Peth Vadgaon |
| Date of Dictation | 03-05-2017. |
| Judgment signed by the P.O. on | 03-05-2017. |
| Judgment/Order uploaded on | 06-05-2017. |